दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१८ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २०० | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 18 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 200 | Pages 4 | Rate 4 Rs

### मराठी शाळा दाखवून लाटला ५ कोटींचा निधी?

**मुंबई**–सेनगाव तालुक्यातील कोळसा येथील विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाच्या नामांकित इंग्रजी शाळेच्या चौकशीचे आदेश देण्यात आल्याची घोषणा इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सोमवारी विधानसभेत केली आहे. त्यानुसार पुढील पंधरा दिवसात या शाळेची चौकशी होऊन दोषीवर कारवाई होणार असल्याची माहिती आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी दिली आहे.सेनगाव तालुक्यातील कोळसा येथे विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मराठी शाळा असतांनाही कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून इंग्रजी शाळा दाखविण्यात आली. त्यानुसार इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या राजे यशवंतराव होळकर नामांकित शाळा योजनेचा लाभ घेण्यात आला. या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे दाखवून या शाळेने सुमारे ५ कोटी रुपये उचलण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या शिवाय मराठी शाळेची मान्यता एका ठिकाणी असतांना दुसरीकडे शाळा सुरु केल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. या प्रकरणी शाळेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस
# सांगलीसह अक्कलकोटमध्येही गारपीट
## हवामान विभागाकडून पुढील चार दिवस पावसाचा इशारा

**महाराष्ट्रात आज अनेक भागांमध्ये गारांचा पाऊस पडला. अनेक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊसही झाला आहे. सांगलीच्या मिरजमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. मिरजच्या बेडग आणि आरगसह येथील परिसरात पाऊस पडला आहे.हवामान विभागाने सांगली जिल्ह्यात दोन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा जो अंदाज वर्तवला होता, तो आज तंतोतंत खरा ठरला असून जिल्ह्याच्या अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि जोरदार गारपीट झाली आहे. वादळी वाऱ्यासह आलेल्या या पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवनावर परिणाम झाला असून, पावसासोबतच झालेल्या मोठ्या गारपीटीमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटमध्येही गारपीट झाली. यामुळे तालुक्यातील गहू, ज्वारी आणि द्राक्षे या पिकांना अवकाळी पावसाचा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राज्यातील तीन जिल्ह्यांना गारपीटीने झोडपून काढले आहे. यात सांगली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा समावेश आहे.भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रात, विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा दिला असून सोलापूर, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांसाठी 'हाय अलर्ट' जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज असून, या काळात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामानातील या बदलाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे आणि विजांपासून संरक्षणासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# एथेनॉल प्रकल्पांसाठी व्याज अनुदान योजना वाढवा
## खा.बजरंग सोनवणे यांनी घेतली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट

दैनिक वादळ वार्ता
**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट घेऊन एथेनॉल प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या व्याज अनुदान योजना – २०१८ संदर्भातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले.या भेटीदरम्यान पुणे येथील वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांच्या निवेदनाच्या आधारे साखर उद्योगासमोरील अडचणी मांडण्यात आल्या. देशात इथेनॉल मिश्रण कार्यक्रम (ए-२०) यशस्वी करण्यासाठी साखर उद्योगाने मोठे योगदान दिले असून, एथेनॉल प्रकल्पांमध्ये सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा सुमारे ४० टक्के वाटा असल्याचे खा. सोनवणे यांनी नमूद



केले.व्याज अनुदान योजनेअंतर्गत अनेक साखर कारखान्यांना दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही अनुदानाची रक्कम मिळालेली नाही, याकडे त्यांनी गृहमंत्र्यांचे लक्ष वेधले. बँकांनी कर्जावरील व्याजाची वसुली केलेली असतानाही संबंधित अनुदान प्रलंबित असल्यामुळे साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, गेल्या सहा वर्षांपासून साखरेचा किमान आधारभूत दर (एमएसपी) स्थिर असून ऊस उत्पादकांना एफआरपीची रक्कम १४ दिवसांत देण्याची सक्ती असल्याने साखर कारखान्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. महाराष्ट्रातील एफआरपी थकबाकी सुमारे ५ हजार कोटी रुपयांवर पोहोचल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.दरम्यान, व्याज अनुदान योजना – २०१८ ची मुदत वाढविणे तसेच प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करणे, अशी मागणी खा. सोनवणे यांनी गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे केली.यावर गृहमंत्री अमित शाह यांनी विषयाची सकारात्मक दखल घेत संबंधित मंत्रालयाशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती खा. सोनवणे यांनी दिली.

# तळोदा शहरात बिबट्याचा थरार; आमराई परिसरात बोकड ठार, नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा नगरपालिका हद्दीतील आमराई परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, एका शेतकऱ्याच्या बोकडावर हल्ला करून त्याला जागीच ठार केले आहे. या घटनेमुळे शहरालगतच्या वस्तीमध्ये प्रचंड भीती पसरली असून, वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी आक्रमक मागणी नागरिक करत आहेत.

शहरातील खर्डी नदीपलीकडे जुन्या भंवर रस्त्यावरील आमराई परिसरात साईबाबा मंदिराजवळ धानका वस्ती आहे. या वस्तीला लागूनच शेतकरी राजेश तुकाराम सूर्यवंशी यांची शेती आहे. सोमवार, दि. १६ मार्च रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास सूर्यवंशी यांच्या शेतातील झोपडीत पाळीव बोकड आणि शेळ्या बांधलेल्या होत्या. यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झोपडीत शिरून एका बोकडावर झडप घातली आणि त्याला जागीच ठार केले.

बिबट्या बोकडाचा गळा पकडून त्याचे रक्त पीत असताना ही बाब स्थानिक नागरिकांच्या लक्षात आली. नागरिकांनी तात्काळ आरडाओरड केली. बोकड दोराने बांधलेला असल्याने बिबट्याला तो ओढून नेता आला नाही. लोकांमुळे बिबट्याने तिथून पळ काढला, मात्र काही वेळाने तोच बिबट्या पुन्हा त्याच शिकार केलेल्या ठिकाणी





परतल्याचे नागरिकांनी पाहिले. नागरिकांनी पुन्हा धाव घेत आवाज केल्यावर बिबट्या अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला.आमराई परिसरात धानका समाजाची मोठी वस्ती असून, येथे नागरिकांचा रात्रंदिवस वावर असतो. बिबट्याने थेट झोपडीत शिरून हल्ला केल्याने आता नागरिकांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी देखील याच ठिकाणी बिबट्याने शेळीवर हल्ला केला होता. त्यावेळी वनविभागाने पिंजरा लावला होता, मात्र बिबट्या त्यात अडकला नव्हता. आता पुन्हा त्याच ठिकाणी हल्ला झाल्याने वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.या संदर्भात नागरिक म्हणतात की,वनविभागाने तातडीने या घटनेचा पंचनामा करून शेतकरी राजेश सूर्यवंशी यांना झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी.या नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्यासाठी परिसरात तात्काळ पिंजरा लावण्यात यावा. परिसरात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी रात्रीची गस्त वाढवावी जेणेकरून कोणतीही जीवितहानी होणार नाही.

# टायर फुटल्याने बसला आग
# शिवसैनिकांनी प्रवाशांचे प्राण वाचवले

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज-मांजरसुंभा रोड वरील सारणी येथे एका खाजगी बसचा टायर अचानक फुटल्याने बसला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली.मात्र प्रसंगावधान राखत शिवसेनेचे दत्ताभाऊ काकडे व शहरप्रमुख आकाश अप्पा चाळक यांनी तत्परता दाखवत सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढून मोठा अनर्थ टळला.घटनेनंतर अवघ्या पाच मिनिटांत दत्ताभाऊ काकडे व आकाश अप्पा चाळक घटनास्थळी पोहोचले.बसमध्ये आग लागलेली असतानाही जीवाची पर्वा न करता त्यांनी प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले.सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढल्या नंतर त्यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे पुढील उपचारासाठी



दवाखान्यात पाठविण्यात आले.या घटनेदरम्यान आंबेजोगाई येथील दोन अज्ञात तरुणांनीही मदतीसाठी धाव घेतली. त्यांच्या सहकार्यामुळे बचावकार्य अधिक जलद गतीने पार पडले. याबाबत बोलताना दत्ता भाऊ काकडे म्हणाले की,त्या क्षणी रील बनवण्यापेक्षा लोकांचे जीव वाचवणे आमच्या साठी महत्त्वाचे होते. आम्ही शिवसैनिक म्हणून कर्तव्य समजून काम केले. धोकादायक परिस्थितीतही धाडसाने प्रवाशांचे प्राण वाचवल्याचा आनंद असल्याचेही त्यांनी सांगितले.दरम्यान,सर्व प्रवासी सुरक्षित बाहेर काढल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.या धाडसी कार्या बद्दल दत्ताभाऊ काकडे व आकाश अप्पा चाळक यांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# धर्मांच्या झेंड्यांची उंची वाढवण्यापेक्षा विचारांची उंची वाढवावी : नगराध्यक्षा सिताताई बनसोड
## केज पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

रामनवमी व रमजान ईद या सणांच्या पार्श्वभूमीवर केज पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या बैठकीचे आयोजन केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या बैठकीस अध्यक्ष म्हणून केज नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड उपस्थित होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून जनविकास परिवर्तन आघाडीचे नेते डॉ. हरुणभाई इनामदार उपस्थित होते.




यावेळी मुस्लिम समाजातील मौलवी तसेच हिंदू समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीच्या सुरुवातीला शहरातील विविध समस्या नागरिक व पत्रकारांनी मांडल्या. यावेळी बोलताना डॉ. हरुणभाई इनामदार यांनी केज शहर 'डिजे मुक्त' झाले पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करून सण शांततेत साजरे करावेत, असे आवाहन केले.अध्यक्षीय समारोप करताना नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांनी धर्मांच्या झेंड्यांची उंची वाढवण्यापेक्षा विचारांची उंची वाढवावी, असे प्रतिपादन करत सामाजिक सलोखा व ऐक्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुकुमार बनसोडे (झडख) यांनी केले, तर आभार लक्ष्मण किर्तने (झडख) यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलिस शिपाई शिवाजी कागदे व पोलिस हवालदार बाळासाहेब अहंकारे यांनी विशेष प्रयत्न केले.या बैठकीस दोन्ही समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून शांततेचा संदेश दिला.

# संपादकीय

## घाबरगुंडी आणि घसरगुंडी

इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धात सुरू असलेली बॉम्बफेक थांबण्याचे नाव घेत नसल्याने, जगभरातील शेअर बाजारांमध्ये रोज भूकंप होत आहेत. या युद्धस्थितीने निर्माण झालेल्या तेल आणि गॅसटंचाईने भारतातील शेअर बाजारात अब्जावधी रुपयांची गुंतवणूक भक्ष्यस्थानी पडली असून, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १४७० अंकांनी कोसळला, तर राष्ट्रीय शेअर बाजारात ४८८ अंकांची तीव्र घसरण झाली. त्यामुळे आणखी एक 'काळा शुक्रवार' पाहण्याची वेळ लाखो भारतीय गुंतवणूकदारांवर आली. गेल्या १५ महिन्यांतील ही सर्वांत मोठी पडझड ठरली आहे. युद्धकाळात इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचे नाक दाबल्यानंतर जगभरातील तेल आणि गॅसपुरवठा खुंटल्याने शेअर बाजारांना हे कापरे भरले आहे. दोन दिवसांपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काहीशा सकारात्मक विधानांमुळे या पडझडीला थोडा लगाम बसला होता; परंतु त्यानंतर पुन्हा संघर्ष तीव्र झाला.गेल्या वर्षाअखेरीस भारतीय बाजार नवनवी शिखरे गाठत होता. यंदा नववर्षात त्याला उतार पडण्यास सुरुवात झाली. भारत आणि अमेरिकेतील व्यापारकराराची चाहूल लागल्याने काही काळ तेजीचे वातावरण निर्माण झाले खरे; पण इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धस्थितीने पुन्हा त्यावर पाणी पडले. त्यातच इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांना अटकाव केल्याने जगभरात तेलसंकट उभे राहिले आहे. मुळातच भावनांच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या शेअर बाजारांमध्ये या परिस्थितीचे झटके बसणार, हे उघड होते. त्यामुळे भारतीय भांडवलबाजाराचे मूल्य ५३३ अब्ज डॉलरने घसरले. अनेक लहान देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षा ही रक्कम मोठी आहे. दोन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी युद्ध 'अंतिम टप्प्यात' असल्याचे विधान केल्याने बाजार काहीसा सावरला होता; पण उलटपक्षी त्यानंतर संघर्ष तीव्र झाला आणि इराणचे नवे नेते मजतबा खामेनी यांनी होर्मुझची सामुद्रधुनी बंदच राहील, असा इशारा दिला. या साऱ्यामुळे परिस्थिती चिघळली आहे. गुरुवार आणि शुक्रवारी तर गुंतवणूकदारांचे अनुक्रमे सहा लाख कोटी रुपये आणि नऊ लाख कोटी रुपये बुडाले आहेत.युद्धस्थिती आणि विस्कळित पुरवठा साखळीने निर्माण झालेल्या इंधनटंचाईचे सर्वदूर परिणाम वाहन उद्योग आणि आनुषंगिक क्षेत्रांना भेडसावत आहेत. भारताप्रमाणेच युरोप, अमेरिकेसह जगभरातील शेअर बाजारांमध्ये हीच स्थिती आहे; त्याचे पडसाद भारतीय बाजारात उमटणे साहजिक आहे. या स्थितीत परकीय गुंतवणूकदारांनी विक्रीचा मारा केला. त्यातून सुमारे ५७ हजार कोटी रुपयांचे भांडवल बाहेर गेल्याने बाजारावर अधिकच दबाव आला आणि घसरण तीव्र झाली. इंधन दरांतील वाढीमुळे आयातीचे बिल वाढणार आणि परकीय चलनाच्या गंगाजळीवर भार आल्याने रुपयाने पुन्हा तळ गाठला आहे.भारतासारख्या देशांमध्ये शेअर बाजार हा सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या भावनांचे प्रतिनिधित्व करीत असला, तरी एकूण देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मूल्यमापनाचे ते एकमेव साधन नाही, हे वास्तव सर्वांनीच विशेषत: अशा काळात लक्षात घेतले पाहिजे. त्यामध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्न, महागाईचा दर, बेरोजगारी, औद्योगिक उत्पादन, व्यापारतूट आणि परकीय चलनाचे साठे अशा मूलभूत विषयांवर सतत नजर ठेवून परिस्थितीचे आकलन करून घेणे आवश्यक आहे. त्या कसोट्यांवर भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत आहे, असे जागतिक संस्थांनीही म्हटले आहे. हे मुद्दे लक्षात घेतले, तर सध्या कोसळलेला बाजार पुन्हा सावरणार आहे, हे वास्तव समोर येते. त्यामुळेच सर्वसामान्य गुंतवणुकदारांनी या दबावामुळे घाबरून विक्री करणे अतिघाईचे ठरेल; तसेच बाजाराचा नेमका तळ न गवसल्याने अवाजवी खरेदीचाही सपाटा तोट्यात नेऊ शकतो.एकाच समभागात सर्व गुंतवणूक अडकवून ठेवण्यापेक्षा प्रमाणबद्ध विविधीकरण नेहमीच जोखीम कमी करते, हा जगभरातला अनुभव आहे. अशा जागतिक आव्हानांच्या काळात तंत्रशुद्ध अभ्यास करून आणि विश्वासू तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊनच पावले उचलण्याची गरज आहे. सध्या अनेक तज्ज्ञ गुंतवणुकदारांना संयम राखण्याचा सल्ला देत आहेत, तो विचारात घेतला पाहिजे. आर्थिक पाया भक्कम असलेल्या कंपन्यांचे समभाग निवडून, त्यात दीर्घकालीन गुंतवणूक फायद्याची ठरते; त्याप्रमाणेच पद्धतशीर गुंतवणूक योजनेचा (एसआयपी) पर्याय लाभदायक ठरतो. एकंदरीत तेजी किंवा मंदीच्या लाटेत वाहून जाण्यापेक्षा आपली गुंतवणुकीची क्षमता आणि मोबदल्याचे उद्दिष्ट निश्चित करून अडचणीच्या स्थितीतही त्याच मार्गाने धीराने वाटचाल करणे, हाच सध्याचा योग्य मार्ग आहे.

# केज येथे पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये रंगणार चिमुकल्यांचे स्नेहसंमेलन

## तालुक्यातील पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-अध्यक्ष खंडेराव चौरे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा पवनराजे इंग्लिश स्कूल येथे दि. २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता एलकेजी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे भव्य स्नेहसंमेलन रंगणार आहे. या कार्यक्रमात लहान चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांची जोरदार तयारी केली असून, उपस्थितांना मनोरंजनाची पर्वणी मिळणार आहे.

सदर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांकडून नाटिका, गीते, नृत्य तसेच वाद्य सादरीकरण अशा विविध कलागुणांचे दर्शन घडणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा उत्कृष्ट आविष्कार सादर करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. त्यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार आणि बहारदार होणार असल्याचे चित्र आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष तथा तज्ञ शिक्षक खंडेराव चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, त्यांच्या विशेष प्रयत्नातून स्नेहसंमेलनाची भव्य तयारी करण्यात आली आहे.

तरी केज तालुका व पंचक्रोशीतील सर्व पालकांनी आणि नागरिकांनी या स्नेहसंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन अध्यक्ष खंडेराव चौरे यांनी केले आहे.



# कामगार नेते अभिजीत राणे यांची भाजपा आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

धडक कामगार युनियनचे संस्थापक-महासचिव आणि 'दैनिक मुंबई मित्र'चे संपादक अभिजीत राणे यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपा कामगार आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल कामगार वर्गात आनंदाचे वातावरण असून, विविध संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.याच पार्श्वभूमीवर, राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने मुंबई जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई शहराचे उपाध्यक्ष केरबा डावरे ,कार्याध्यक्ष दत्तात्रय मुळीक, ठाणे जिल्हाध्यक्ष भरत सकपाळ , मैत्री संस्थेचे अध्यक्ष सुरेश भोईर व इतर पदाधिकाऱ्यांसह अभिजीत राणे यांची गोरेगाव कार्यालयात भेट घेतली. यावेळी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



कामगारांच्या प्रश्नांना आता नवा न्याय मिळणार असून अभिजीत राणे यांनी गेली अनेक वर्षे धडक कामगार युनियनच्या माध्यमातून हजारो कामगारांच्या हक्कासाठी लढा दिला आहे. आता सत्ताधारी पक्षाच्या कामगार आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा त्यांच्याकडे आल्याने, राज्यभरातील असंघटित आणि संघटित कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी मोठी मदत होईल, अस कामगार श्रेत्रात व्यक्त केला जात आहे.

# कल्याण येथे सावित्रीबाई फुले यांचा स्मृती दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

सामाजिक बंधन, रुढी परंपरा, अनिष्ठ चालिरिती या मध्ये अडकलेल्या स्त्रीला शिक्षणाच्या माध्यमातून ताठ मानेने सन्मानाने जगण्याची क्रांती ज्योत सावित्रीबाई फुले यांनी पेटविली असे प्रतिपादन श्री सावता माळी मंडळ कल्याण या संस्थेचे अध्यक्ष अनिल थोरात यांनी येथे केले.संस्थेच्या वतीने कल्याण (प) येथे सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या स्मृती दिना निमित्ताने केले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महिला मंडळच्या अनुराधा भुजबळ (मा मुख्याध्यापिका )ठाणे म न पालिका यांच्या हस्ते पुष्पहार व ज्योत पेटवून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी विद्या चौधरी यांनी आपले विचार मांडले. अनुराधा भुजबळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनवर ओवी सादर केली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदाम गाडेकर यांनी आपले विचार मांडताना



सांगितले की,आपण भाग्यवान आहोत की या कार्यक्रमास सातत्याने उपस्थितांपैकी विद्या चौधरी यांचे शिक्षण महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरु केलेली ओतूर तालुका जुन्नर या शाळेत शिक्षण घेतले आहे. हे सावित्रीबाई फुले यांचे कार्य दिडशे वर्षांनी आपल्या समोर आहे. या ऋणातुन आपण उतराई होण्याकरिता सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. या कार्यक्रमास विद्या चौधरी, शोभा थोरात, मंदा ताम्हाणे अनुराधा भुजबळ, रविंद्र चौधरी, नवनीत गायकवाड,बाजीराव पाटील,अंकित पिंगळे इत्यादी मान्यवर समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

# संवेदना सोशल फाउंडेशनचे वार्षिक स्नेह संमेलन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

समाजातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संवेदना सोशल फाऊंडेशनचे वार्षिक स्नेह संमेलन विक्रोळी कन्नमवार नगर येथे उत्साहात साजरे करण्यात आले.दिव्यांग विद्यार्थ्यांनी नाच व गाणी म्हणून सर्व उपस्थितांचे लक्ष्य वेधून घेतले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जे.आर.खट्टर चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त एम.डी.खट्टर,समाजसेवक अनिल ग्रोवर,ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर,दिशा वेल्फेअर ग्रुप चे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले,मनसे उपाध्यक्ष प्रशांत नेरुरकर, मनसे शाखाध्यक्ष निलेश साळवी,संस्थेच्या अध्यक्षा प्रिती नितीन शिरीसकर,उपाध्यक्ष गणेश गणपत शिरीसकर,सचिव सचिन गणेश शिरिसकर, कोषाध्यक्ष नितीन गणेश



शिरीसकर आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी खेळात प्रावीण्य मिळाल्याबद्दल त्यांना मान्यवरांचे हस्ते प्रशस्तिपत्र देण्यात आली.हे विद्यार्थी व पालक माझी ऊर्जा आहे.त्यांच्या शिवाय मी अपुरी आहे.असे भावनिक उद्गार संस्थेच्या अध्यक्ष प्रिती शिरीसकर यांनी काढले.तर विद्यार्थ्यांचे बसविलेले सांस्कृतिक कार्यक्रम पाहून प्रमुख पाहुणे एम. डी.खट्टर यांनी शिक्षिका व पालक यांचे कौतुक केले.याप्रसंगी कश्मीरा अहिरे,गायत्री गायकवाड, व पल्लवी वारंग या शिक्षक कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सरस्वती गणेश शिरिसकर, विजय विठ्ठल शिरीसकर ,नंदकुमार विश्वनाथ जोशी,मंदाकिनी गणेश चिपळूणकर,क्षितिज गिम्हवणेकर ,देवांशी प्रतिक आंबेकर यांनी बरीच मेहनत घेतली होती.एम.डी.खट्टर यांनी संस्थेस पंचवीस लाख रुपये देणगी दिली.

# ठाणे महापालिकेच्या गटनेतेपदी राष्ट्रवादी (श.प.) अभिजीत पवार यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या सुचनेनुसार तथा जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या शिफारशीवरून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे महानगर पालिकेतील गटनेतेपदी नगरसेवक अभिजीत पवार यांची निवड करण्यात आली आहे.



ठाणे महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अश्रफ शानू पठाण यांची ठाणे महानगर पालिकेत गटनेतेपदी निवड करण्यात आली होती. मात्र, नुकत्याच झालेल्या महासभेत शानू पठाण यांची विरोधी पक्ष नेतेपदी निवड केल्याने रिक्त झालेल्या गटनेतेपदावर अभिजीत पवार यांची निवड करण्यात आली आहे. अभिजीत पवार हे प्रभाग क्रमांक ९ मधून विजयी झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे तथा डॉ.जितेंद्र आव्हाड यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. या निवडीनंतर बोलताना, डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशाने तसेच मनोज प्रधान यांच्या शिफारशीनुसार आपली गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाची सर्वसमावेशक भूमिका मांडण्यास आपण प्राधान्य देणार असून पक्षाच्या नगरसेवकांना एकसंघ ठेवण्यासाठी आपण काम करणार आहोत, असे अभिजीत पवार यांनी सांगितले.



**ठाणे : दिवा शहरातील ग्लोबल इंग्लिश शाळेच्या मैदानातील बंद व जुनी असलेली मिनी स्कुल बस आगीत जळून खाक झाली आहे. आगीचे कारण समजू शकले नसून अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.**

# बोकडविरा येथे कबड्डीच्या सामन्यांचा थरार

## प्रत्येकाला गाववाल्यांच्या खांद्याची जाणीव हवी : महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उरण हे ऐत्याहासिक पार्श्वभूमी असलेले शहर आहे. कबड्डी हा मातीशी निगडित मर्दानी खेळ आहे. अशा या कबड्डीची परंपरा आजही बोकडविरा येथे जपली जातेय. येथील सर्व ग्रामस्थ कबड्डीसाठी एकत्र येतात, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. गावाशी प्रत्येकाचे अतूट नाते हवे. कारण शेवटी गाववाल्यांच्या खांद्यावरूनच आपल्याला शेवटचा प्रवास करायचा असतो, याची जाणीव हवी. त्यामुळे गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे आपले कर्तव्यच असते. तेथे कधीही राजकारण आडवे येता कामा नये. गावाचा सर्वांगीण विकास हे ध्येय उराशी बाळगणारी मंडळी हवीत, तर गावाचा विकास होतो. माझ्याकडे जे जे आहे ते ते देण्याचा मी प्रयत्न करतोय, त्यामुळे ग्रामस्थांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी बोकडविरा येथे मत मांडले. सरपंच कबड्डी चषकाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, पंचायत समिती सदस्य दीपक भोईर, बोकडविरा सरपंच अपर्णा पाटील, उपसरपंच ध्रुव पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे आस्वाद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. श्री गणेश मित्र मंडळ बोकडविरा (गणेशपूर) आणि ग्रामस्थ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सरपंच कबड्डी चषक आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उदघाटन रविवारी (ता. १५) सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर म्हणाले, जर आपला समाज एकत्र असला तर आपण कितीही उंच भरारी घेऊ शकतो. भावना घाणेकर यांना उरणच्या जनतेने बहुमताने निवडून दिले, ही समाजाची ताकद आहे. आमच्याकडे सत्ता नाही तरीही महेंद्रशेठ, भावना घाणेकर आणि मी पक्षाशी एकनिष्ठ आहोत. सत्ता येते, सत्ता जाते, पण सत्तेचा माज नसावा. उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर म्हणाल्या, वास्तविक मी निवडणुकीला उभीच राहणार नव्हती; परंतु महेंद्रशेठ आणि मनोहर भोईर यांच्या हट्टापायी मी निवडणुकीला उभी राहिले. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान माझा पाय मुरगळला, पण तरीही मी पायाला भिंगरी लावल्यागत लोकांपर्यंत गेले. कारण मी आगरी समाजाची वाघीण आहे. माझ्यावर उरणच्या जनतेने विश्वास दाखवला आहे, आता तो सार्थ ठरवायचा आहे.सरपंच कबड्डी चषकात रायगड आणि कोकणातील ३२ संघांनी सहभाग घेतला आहे. यावेळी जयवंत पाटील, निर्मलाताई पाटील, मनोज पाटील, गावचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंचित-पीडितांच्या डोळ्यातील अश्रूंना आवाज देणारे पत्रकार मिलिंद कांबळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**निलंगा | प्रतिनिधी**

सर्व समाजातील गरीब, वंचित आणि अन्यायग्रस्तांच्या वेदनांना शब्द देत त्यांच्या न्यायासाठी सातत्याने झटणारे निर्भीड पत्रकार मिलिंद कांबळे तसेच वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते महेश कांबळे यांचा वाढदिवस वंचित बहुजन आघाडीच्या मध्यवर्ती कार्यालयात अत्यंत उत्साह, आपुलकी आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी दोन्ही व्यक्तिमत्त्वांच्या सामाजिक कार्याची आठवण काढत कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात सर्वप्रथम बोलताना वंचित बहुजन आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा आयुष्यमती मंजुषाताई निंबाळकर यांनी अत्यंत भावनिक शब्दांत मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, पत्रकार मिलिंद कांबळे हे केवळ पत्रकार नसून सर्वसामान्य जनतेचा आवाज आहेत. गरीब, वंचित आणि अन्यायग्रस्तांच्या हक्कासाठी ते सातत्याने लढत आहेत.अनेक अडथळे आणि संकटे आले तरीही त्यांनी कधीही सत्याची बाजू सोडली नाही. समाजातील सामान्य माणसाचा प्रश्न शासनाच्या दारापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केले आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, अशा निर्भीड आणि स्वाभिमानी पत्रकाराच्या पाठीशी वंचित बहुजन आघाडी ढाल बनून कायम उभी राहील. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आणि जनतेच्या प्रश्नांवर आपण असेच निर्भयपणे आवाज उठवत राहा. कोणत्याही शक्तीला भिक घालू नका, वंचित बहुजन आघाडी कायम आपल्या सोबत आहे, असा शब्द त्यांनी यावेळी दिला.

यानंतर बोलताना ज्येष्ठ संपादक मोहन क्षिरसागर म्हणाले की, आजच्या स्वार्थी आणि धावपळीच्या काळात स्वतःच्या सुख-दुःखाची पर्वा न करता समाजासाठी धावणारे लोक फारच दुर्मिळ झाले आहेत. मात्र पत्रकार मिलिंद कांबळे हे असे व्यक्तिमत्त्व आहे की, जेव्हा एखाद्या गरीब माणसावर अन्याय होतो तेव्हा त्याच्या वेदनांना शब्द देणारी त्यांची लेखणी सर्वप्रथम पुढे सरसावते. अनेक गरजू आणि पीडित लोकांच्या आयुष्यात त्यांनी आशेचा दिवा पेटवला आहे. संकटात सापडलेल्या माणसाला धीर देणारा आणि त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा हा माणूस समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांनी समाजासाठी अजून मोठे कार्य करावे, अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे तालुका प्रभारी देवदत्त सूर्यवंशी निलंगेकर (मामा), डॉ. हिरालाल निंबाळकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, पत्रकार मिलिंद कांबळे यांची लेखणी ही केवळ बातमी लिहिणारी लेखणी नसून ती अन्यायाविरुद्ध उभी राहणारी ताकद आहे. त्यांच्या लेखणीमुळे अनेक पीडितांना न्यायाचा मार्ग मिळाला आहे. तर युवा नेते महेश कांबळे हेही समाजातील तरुणांना एकत्र आणत सामाजिक प्रश्नांवर लढण्याची प्रेरणा देत आहेत.

कार्यक्रमाच्या शेवटी दोन्ही मान्यवरांवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. समाजासाठी झटणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि सामान्य माणसाच्या न्यायासाठी त्यांचा लढा असाच कायम राहो, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

यावेळी जितू कांबळे, अमर सुतके, कुलदीप कांबळे, स्वागत सुरवसे, निकेतन गायकवाड, सचिन कांबळे, राहुल कांबळे, महादेव सोनकांबळे, योगेश सूर्यवंशी, निरज कांबळे, अमन सूर्यवंशी, सुमित कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# करीअर कट्टा उपक्रमांतर्गत उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार डॉ.सुनंदा आस्वले यांना प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर | प्रतिनिधी**



करीअर कट्टा उपक्रमाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १४ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले. सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ, गडचिरोली द्वारा संचालित ग्रामगीता महाविद्यालय चिमूर च्या प्राचार्य डॉ. सुनंदा आस्वले यांना करीअर कट्टा च्या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. विकसित भारत २०४७ : महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाची भूमिका या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे औचित्य साधून हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. अमित भोळे (संचालक, महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार) व मा. डॉ. विपिन इटनकर (आयुक्त, नागपूर महानगरपालिका) यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी मा. ड. अभिजित वंजारी (आमदार, महाराष्ट्र विधान परिषद) होते. मा. यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र) व मा. डॉ. स्मिता वंजारी (सिनेट सदस्या, रा. तू. म. नागपूर विद्यापीठ) उपस्थित होते.दरम्यान डॉ. सुनंदा आस्वले यांनी हे पुरस्कार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग आणि करीअर संसद चे पदाधिकारी व सदस्य यांच्या समर्पित कार्यामुळे हे यश संपादित झाले आहे आणि या पुरस्कारामुळे अधिक गुणवत्तापूर्ण उपक्रम राबवण्यास प्रेरणा मिळाली आहे असे मत व्यक्त केले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, करीअर संसद चे पदाधिकारी व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनंदा आस्वले व करीअर कट्टा चे समन्वयक डॉ. मृणाल वऱ्हाडे यांचे अभिनंदन केले.

# छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त एम.डी. हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड | प्रतिनिधी**




छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त समाजोपयोगी उपक्रम म्हणून एम.डी.हॉस्पिटल, नांदेड यांच्या वतीने दि.११ मार्च २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी व स्वेच्छा रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले.या उपक्रमाचे नेतृत्व एम.डी.हॉस्पिटलचे संचालक डॉ.मन्मथ माधवराव डामरंचे यांनी केले.या आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांची बीपी,शुगर,वजन, ईसीजी,रक्त तपासणी,दात तपासणी, नेत्र तपासणी तसेच कान-नाक-घसा तपासणी करण्यात आली.याशिवाय महिला व मुलांशी संबंधित विविध आजारांचीही मोफत तपासणी करण्यात आली.लहान मुलांसाठी विशेष सुवर्णप्राशन शिबिर तसेच बालसंस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.परिसरातील अनेक नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.यावेळी आयोजित रक्तदान शिबिरालाही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.अनेक युवक-युवतींनी प्रथमच रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. जिजाऊ ब्लड बँकेचे संचालक सूरज पाटील व त्यांच्या टीमने रक्तसंकलनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.

या उपक्रमात एम.डी. हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांसह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी,मित्रपरिवार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य व बलिदानाला अभिवादन करत समाजोपयोगी कार्याच्या माध्यमातून त्यांना मानाचा मुजरा करण्यात आला.या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत झाली. डॉ मन्मथ सरांनी यावर्षी वाढता उन्हाळा आणि वाढते तापमान याबद्दलची माहिती सांगताना त्यातून होणारा त्रास आणि संभाव्य धोके लक्षात घेता उन्हाळ्यात सर्वांनी काय काळजी घ्यायल पाहिजे याबद्दल सुद्धा मार्गदर्शन केले.

डॉक्टर मनमत यांचे डॉक्टर आपल्या दारी मोहिमेंतर्गतील एम.डी हॉस्पिटल आपल्यासाठी सदैव २४ तास सेवा देण्यास तयार आहे तसेच आपल्या हॉस्पिटल तर्फे गरजू पेशंटच्या घरी जाऊन सुद्धा तपासणी केली जाते

# जि.प.अध्यक्षपदी मा.उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांची नियुक्ती देवणी तालुका हा भाजपचा बालेकिल्ला

दैनिक वादळ वार्ता
**वलांडी | प्रतिनिधी**

दि.१६ मार्च देवणी तालुक्यात जिल्हा परिषद अध्यक्षपदी मा.उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांची नियुक्ती झाल्याने देवणी सह वलांडी, धनेगाव, संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे वलांडी गटाला जिल्हा परिषद अध्यक्ष पदाचा मान देऊन पक्षश्रेष्ठींनी तालुक्यातील कार्यकर्ते व मतदारांच्या सन्मान केला आहे त्याबद्दल सर्व स्तरातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे गेल्या दहा वर्षांपासून रखडलेली विकास कामांना आता निश्चित गती मिळेल तसेच ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा पायाभूत विकास शिक्षण आरोग्य व नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्याने न्याय मिळेल अशी अपेक्षा ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ व्यक्त करत आहेत वलांडी गटावर विश्वास ठेवून जिल्हा परिषद अध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्याबद्दल पक्षसृष्टीचे चे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहे हा सन्मान माझ्याएका व्यक्तीचा नसून संपूर्ण देवणी तालुक्यातील जनतेचा आहे या विश्वासाला पात्र ठरत सर्वांगीण विकासात साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत भविष्यातील प्रतिष्ठेच्या मार्गाने योग्य विकासाची वाटचाल अधिक वेगाणे सुरू राहील असा विश्वास व्यक्त करत पुन्हा एकदा सर्व पक्ष नेतृत्वाची जाहीर आभार मानण्यात येत आहेत देवणी तालुक्याने तीन जिल्हा परिषद व सहा पंचायत समिती पैकी दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती सदस्य निवडून आणून भारतीय जनता पक्षाने देवणी पंचायत समिती स्पष्ट बहुमत मिळून आपल्या ताब्यात ठेवले आहे तसेच विधानसभा विद्यमान आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी मताची आघाडी घेऊन निवडून आणायचे काम देऊन देवणी तालुक्यातील भारतीय जनता पक्षान, पदाधिकारी, कार्यकर्ते,नागरिकांनी केले आहे त्यामुळे संभाजीराव पाटील निलंगेकर हे जि.प. अध्यक्ष पदासाठी देवणी ला प्राधान्य दिले आहेत निवडणुकीच्या काळात भारतीय जनता पक्षाचे पूर्वीचे हेर मतदार संघ भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात आहे या मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे अनेक आमदार होऊन गेले मात्र हा मतदार संघ बरेच वर्ष मागासवर्गीयसाठी आरक्षित असल्यामुळे या मतदारसंघाच्या विकास झाला नाही देवणी तालुक्याला सक्षम नेतृत्व उभारी घेत हा मतदारसंघ कायम स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, गुंडप्पा धानोरे, हावगिराव पाटील,या भाजपा गटनेचे यांच्या विचारप्रवाखाली राहिलेला आहे आणि या पुढे पण राहणार



# सरपंच देवानंद गोरे यांनी केला राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांचा सत्कार,

दैनिक वादळ वार्ता
**सेनगाव | प्रतिनिधी**

रामराव वडकुते यांची नुकतीच राज्यसभा खासदारपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर हिंगोली जिल्ह्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात येत आहेत. या अनुषंगाने दि. १५ मार्च रोजी सेनगाव तालुक्यातील वलाना येथील सरपंच देवानंद गोरे यांनी हिंगोली येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा पुष्पहार देऊन सत्कार केला व पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी माधव हांडे, किसन हेंबाडे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी वडकुते यांच्या राज्यसभा खासदारपदी झालेल्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी वडकुते यांनी सातत्याने काम केले असून राज्यसभेच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध प्रश्नांना न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.तसेच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शेती, शिक्षण, रोजगार व विकासकामांना गती मिळावी, अशी



अपेक्षाही उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली. वडकुते यांच्या निवडीमुळे हिंगोली जिल्ह्याला राज्य आणि केंद्र शासनाच्या पातळीवर अधिक बळ मिळेल व विकासाच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेण्यात येतील, असेही यावेळी बोलताना सांगण्यात आले.राज्यसभेवर निवड झाल्यानंतर विविध कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक वडकुते यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करत आहेत. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ते प्रभावी भूमिका बजावतील, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

## दिग्रस (बु.) येथे महाराजस्व अभियान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद!

# तहसीलदार गोरे यांनी केले तक्रारींचे निवारण व प्रमाणपत्राचे वितरण

दैनिक वादळ वार्ता
**कंधार | प्रतिनिधी**

शासन आदेशानुसार कंधार तालुक्यातील दिग्रस (बु.) महसूल मंडळातील वर्षा मुलींचे शाळेत दि.१४ मार्च रोज सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रमुख्याने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या विविध प्रमाणपत्राचे वाटप करून, तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी नागरिकांच्या समस्या व इतर तक्रारीचे निवारण केले.यावेळी नायब तहसीलदार नंदकिशोर भोसीकर, मुदीराज, विनोद पावडे, मंडळ अधिकारी ज्योती निवडंगे, ग्राम महसूल अधिकारी बालाजी केंद्रे,आर.आर.भुरेवार, राहुल केंद्रे,अश्विनी शिंदे,प्रिया भालेराव, ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.






महसूल मंडळ दिग्रस (बु.) येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिरामध्ये उपस्थिताना मार्गदर्शन करतेवेळी तहसीलदार रामेश्वर गोरे म्हणाले मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना बाबत सखोल मार्गदर्शन करत मुंबई अधिनियम प्रमाणे जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत सुधारणा विषयी सखोल माहिती त्याचबरोबर अकृषिक परवानगी रद्द करण्यात आलेल्या अद्यावत सुधारणा बाबत नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून, एक वेळचे अधिमुल्य भरण्याच्या नवीन व्यवस्था बाबत नागरिकांमध्ये जनजागृती करून, उपस्थित शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले. त्याचबरोबर ७/१२ अभिलेखा मध्ये दुरुस्ती करून नागरिकांना ७/१२, विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, जिवंत ७/१२ यांचे वाटप करण्यात आले.सदरचे शिबिर यशस्वी करण्यासाठी दिग्रस महसूल मंडळातील पोलीस पाटील, सरपंच, महसूल सेवक, ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.यावेळी दिग्रस महसूल मंडळाअंतर्गत गावातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लोकप्रतिनिधी म्हणून निवडणुक लढवता आली नाही तरी लोकांचे प्रतिनिधी म्हणून काम करावे

## ‘विकसित भारत युवा संसद’ राज्यस्तरीय परिषदेत विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचा तरुणांना मार्गदर्शनपर संदेश

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज विकसित भारताच्या युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी २०१९ पासून सुरू झालेल्या ‘विकसित भारत युवा संसद’ या व्यासपीठाच्या राज्यस्तरीय परिषदेत विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तरुणांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात, आणीबाणीच्या ५० वर्षांच्या निमित्ताने भारतीय लोकशाहीसाठी मिळालेल्या धड्यांवर चर्चा असा विषय होता. कार्यक्रमाचे संयोजन माय भारतचे संचालक अमित पुंडे यांनी केले होते. आज डॉ. गोऱ्हे यांना प्रमुख पाहुणे म्हणून ऑनलाईन संवाद साधताना सांगितले की, तरुणांना संवाद साधण्याची, आपले स्वप्न, दिशा आणि उद्दिष्ट मांडण्याची संधी मिळावी, यासाठी हे व्यासपीठ उभारण्यात आले आहे. हे अतिशय चांगले व्यासपीठ आहे, जिथे तरुणांना बोलण्याची संधी मिळते आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी ऐतिहासिक संदर्भ देत लोकनेते जयप्रकाश नारायण आणि नानाजी देशमुख यांनी युवकांसाठी छेडलेल्या आंदोलनाचा उल्लेख केला. त्यावेळी विद्यार्थ्यांना आज या वृक्षतोडबंदी, भ्रष्टाचारबंदी, हुंडाबंदी अशा सात शपथा देण्यात आल्या होत्या. आज आणीबाणीच्या ५० वर्षांनिमित्त जिल्हा स्तरावरून सुरू झालेली चर्चा आता राज्यस्तरावर पोहोचली आहे. यातून भारतीय लोकशाहीला काय धडे मिळाले, यावर बोलणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

तरुण पिढीला पुढे जाण्यासाठी तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या, ‘भारत फर्स्ट’ देशाला प्रथम स्थान द्या, त्यानंतर मातृभूमी, गाव, जिल्हा, राज्य आणि कुटुंब. दुसरे ‘सातत्याने अभ्यास’ चांगले बोलण्यासाठी वेळेची मर्यादा, थांबण्याची जाणीव आणि संवाद कौशल्य आवश्यक आणि तिसरे म्हणजे, ‘समोरच्या माणसाशी संवाद’ थोड्या वेळात निर्णयापर्यंत पोहोचणे अशी त्रिसूत्री डॉ. गोऱ्हे यांनी सांगितली.डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या वैयक्तिक प्रवासाचा उल्लेख करत सांगितले की, त्या पोदार मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी दहा वर्षे प्रॅक्टिस केली. नंतर सामाजिक चळवळी आणि शिवसेनेत २५ वर्षांपासून काम करत असल्याचे सांगितले. तुम्हीही पुढे लोकप्रतिनिधी व्हा. निवडून आलात तर उत्तम, अन्यथा लोकांचे प्रतिनिधी म्हणून काम करा. यात महिला आणि पुरुष दोघांवरही सारखी जबाबदारी आहे, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.‘विकसित भारत युवा संसद’ ही स्पर्धा आणि व्यासपीठ देशभरातील युवकांना एकत्र आणून त्यांच्या कल्पना, चर्चा आणि नेतृत्व विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. राज्यस्तरीय परिषदेत विविध विषयांवर तरुणांनी सक्रिय सहभाग घेतला.



# तळोदा प्रशासनाचा ‘अजागळ’ कारभार; जागतिक ग्राहक दिनावर संघटनांचा कडकडीत बहिष्कार!

**दैनिक वादळ वार्ता**

**नंदुरबार । दिपक गोसावी**

येथील महसूल प्रशासनाकडून मंगळवारी प्रशासकीय इमारतीत आयोजित करण्यात आलेल्या ’जागतिक ग्राहक दिना’च्या कार्यक्रमात प्रशासकीय अनास्था आणि अधिकाऱ्यांच्या दांडीबहाद्दरवृत्तीचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. नियोजित वेळेपेक्षा पाऊण तास उलटूनही जबाबदार अधिकारी फिरकले नसल्याने संतप्त झालेल्या ’अखिल भारतीय ग्राहक पंचायत’ आणि ’ग्राहक पंचायत महाराष्ट्र’ या दोन्ही संघटनांनी कार्यक्रमावर बहिष्कार टाकत प्रशासनाचा तीव्र निषेध केला.दरवर्षी १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा केला जातो. मात्र, यंदा १५ मार्चला सुट्टी असल्याने हा कार्यक्रम १७ मार्च रोजी घेण्याचे प्रशासनाने निश्चित केले होते. सकाळी ११ वाजता कार्यक्रमाची वेळ असताना ग्राहक संघटनांचे जिल्हा व तालुका पदाधिकारी वेळेवर उपस्थित झाले. मात्र, तब्बल ४५ मिनिटे उलटूनही एकही जबाबदार अधिकारी फिरकला नाही. जर ग्राहकांच्या समस्या ऐकून घेणारे अधिकारीच उपस्थित नसतील, तर हा कार्यक्रम नक्की कोणासाठी आणि कशासाठी? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.प्रशासकीय दिरंगाईचा कडवट अनुभव आल्यानंतर



दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन प्रशासनाच्या या उदासीनतेचा एकमताने निषेध केला. केवळ कार्यक्रमावरच नव्हे, तर प्रशासनाकडून देण्यात आलेल्या चहापानावरही बहिष्कार टाकून सर्व पदाधिकारी घोषणाबाजी करत कार्यक्रम स्थळावरून निघून गेले. या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.दरम्यान, या गोंधळानंतर तहसीलदार दीपक धिवरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडल्याचा दावा प्रशासनाने केला असला तरी, निमंत्रित १६ पैकी अनेक अधिकारी अनुपस्थित असल्याचे समोर आले आहे. यामध्ये तीन राष्ट्रीय बँकांचे अधिकारी व इतर विभागांच्या अनुपस्थित अधिकाऱ्यांना ’कारणे दाखवा’ नोटीस बजावण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

> **“ यंत्रणांचीच उदासीनता असेल तर हा दिवस केवळ औपचारिकता म्हणून साजरा होईल. प्रशासनाने या प्रकरणी कठोर होण्याची गरज आहे.**
> **– प्रा. संजय शर्मा, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र ग्राहक पंचायत.**

> **“ अधिकारी वेळेवर येत नसल्यामुळे ग्राहकांच समस्या कोणाकडे मांडणार? अशा भूमिकेमुळे ग्राहकांचे हित कसे साध्य होईल?**
> **– भिका चव्हाण, तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत.**

# जिवाचीवाडी येथील पोलीस पाटील पदी श्रीमती शिवकन्या चौरे यांची निवड



**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथे डॉ.श्रीमती शिवकन्या विक्रम चौरे-चोले यांची पोलीस पाटील पदी निवड झाल्याने जिवाची वाडी ग्रामस्थांच्या वतीने मंगळवार दि.१७ मार्च रोजी सकाळी हनुमान मंदिर येथे सत्कार समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला गेल्या १३ वर्षापासुन जिवाचीवाडी येथील तत्कालीन पोलीस पाटील यांचे दिर्घ आजाराने निधन झाल्या मुळे पोलीस पाटील पद हे रिक्त होते.शासनभरती प्रक्रिया सुरू होऊन अर्ज मागविण्यात आले,लेखी परीक्षा व तोंडी मुलाखती घेन्यात आल्याने डॉ. शिवकन्या विक्रम चौरे - चोले यांनी यश मिळविले त्यांची पोलिस पाटील पदावर निवड झाल्या बद्दल जिवाचीवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांचे आभार मानले व कायदा व सुव्यवस्था राखण्या साठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

# केज येथे पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये रंगणार चिमुकल्यांचे स्नेहसंमेलन

### तालुक्यातील पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : अध्यक्ष खंडेराव चौरे

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा पवनराजे इंग्लिश स्कूल येथे दि. २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता एलकेजी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे भव्य स्नेहसंमेलन रंगणार आहे. या कार्यक्रमात लहान चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांची जोरदार तयारी केली असून, उपस्थितांना मनोरंजनाची पर्वणी मिळणार आहे.

सदर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांकडून नाटिका, गीते, नृत्य तसेच वाद्य सादरीकरण अशा विविध कलागुणांचे दर्शन घडणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा उत्कृष्ट आविष्कार सादर करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. त्यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार आणि बहारदार होणार असल्याचे चित्र आहे.या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष तथा तज्ञ शिक्षक खंडेराव चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, त्यांच्या विशेष प्रयत्नातून स्नेहसंमेलनाची भव्य तयारी करण्यात आली आहे.

तरी केज तालुका व पंचक्रोशीतील सर्व पालकांनी आणि नागरिकांनी या स्नेहसंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन अध्यक्ष खंडेराव चौरे यांनी केले आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर कविता गित्ते-कराड यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी विद्यालय केज या संकुलाच्या डॉ.कविता गित्ते-कराड मडम यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेली आहे. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची बँक तयार करण्यासाठी राज्यामध्ये शिक्षक शोध प्रक्रिया राबवण्यात आली होती जिल्हा स्तरावरून सर्व तालुकास्तरीय याद्यांची पडताळणी करून राज्यस्तरासाठी जिल्ह्यातील दहा सर्वोत्तम शिक्षकांची यादी गुणांकनांसह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला पाठवण्यात आल्या होत्या त्याप्रमाणे कार्यवाही करून राज्यस्तरावर ३३२ नामांकने प्राप्त झाली.

राज्यातील शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांचे आयडॉल शिक्षक म्हणून ओळख निर्माण झाली आहे या शिक्षकांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग करून संपूर्ण शिक्षण विभागाला करून देणे ही काळाची गरज आहे.त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर निवड झालेल्या शिक्षकांना राज्य,जिल्हा आणि तालुकास्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षणे कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये या शिक्षकांचा प्रामुख्याने सहभाग घेतला जाणार असून त्यांना आवश्यकते नुसार तज्ञ मार्गदर्शक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहे.त्यांच्या नावीन्यपूर्ण व दर्जेदार गुणवत्तापूर्ण केलेल्या कामाचे चित्रीकरण,दस्त, अभिलेख,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था हे वेळोवेळी उदाहरणार्थ ऑडिओ,व्हिडिओ टेक्स्ट तयार करणे व संकेत स्थळावर प्रकाशित करण्याचे काम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे हे करणार आहेत.शिक्षण परिषदां मध्ये आयडॉल शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण व विशेष कार्याचा प्रचार प्रसार करून त्यांचे उद्बोधन ठेवण्यात येणार आहे.तसेच आयडॉल शिक्षकांना विविध समित्यांच्या बैठकांमध्ये सन्मान करून त्यांच्या कार्याचा लेखाजोखा बैठकीत तालुका, जिल्हा, विभाग स्तरावरील विद्यार्थी गुणवत्तेच्या विविध समित्यांमध्ये त्यांच्या कामाचा उपयोग करण्यात येणार आहे. एकंदरीत त्यांच्या गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण ज्ञानाचा उपयोग महाराष्ट्रातील सर्व शैक्षणिक कार्यात करून घेतला जाणार आहे.या निवडी बद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबेजोगाईचे प्राचार्य डॉ. अनिल मुरकुटे सर गटशिक्षणाधिकारी, कार्यालयाचे गटशिक्षण अधिकारी श्री.सुनील केंद्रे सर,वरिष्ठअधिव्याख्याता डॉ.गिरी मॅडम, डॉ.जयपाल कांबळे सर डॉ.सुरवसे सर,डॉ.गोरे सर,डॉ.देशमुख सर ज्येष्ठ शिक्षण विस्तारअधिकारी दत्ता आबा चाटे,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड साहेब, उपाध्यक्ष राजेश कापसे सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.तसेच साने गुरुजी निवासी विद्यालयास नुकताच डट--ऋ अ+ प्राप्त झाला आहे.सदर शाळा जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर उपक्रम शील शाळा व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून नावारूपाला येत आहे यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.



# नंदुरबारच्या सुपुत्राची कोकण किनारपट्टीवर ऐतिहासिक झेप शिक्षक महेंद्र वसावे यांनी पूर्ण केली ५६ किमीची ’अल्ट्रा मॅरेथॉन’

**दैनिक वादळ वार्ता**

**रवींद्र वळवी । मोलगी**

कोकणच्या निसर्गरम्य पण आव्हानात्मक गणपतीपुळे किनारपट्टीवर पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ’अल्ट्रा मॅरेथॉन’ स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्याच्या दुर्गम भागातील सुपुत्राने आपल्या जिद्दीचा झेंडा फडकवला आहे. मूळचे धडगाव तालुक्यातील ’बिजरी’ गावचे रहिवासी आणि सध्या पंढरपूर येथे कार्यरत असलेले शिक्षक महेंद्र वसावे यांनी ५६ किलोमीटरचे विस्तीर्ण अंतर अवघ्या ७ तास ४० मिनिटांत पूर्ण करून एक देदीप्यमान यश संपादन केले आहे.

गणपतीपुळे येथील मॅरेथॉनचा मार्ग तांत्रिकदृष्ट्या अत्यंत कठीण मानला जातो. समुद्रालगतचे चढ-उतार असलेले रस्ते आणि कोकणातील कमालीचे दमट हवामान यामुळे अनेक धावपटूंचा कस लागला. मात्र, महेंद्र वसावे यांनी आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर या सर्व संकटांवर मात केली. या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील नामवंत धावपटू सहभागी झाले होते, ज्यांच्या उपस्थितीत वसावे यांनी हे यश मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.वसावे यांच्या या यशामागे त्यांचा प्रदीर्घ अनुभव दडलेला आहे. यापूर्वी त्यांनी अनेक ’हाफ’ आणि ’फुल’ मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. विशेषतः गेल्या वर्षी लोणावळा येथे झालेली ५० किलोमीटरची कठीण ’टाटा अल्ट्रा मॅरेथॉन’ पूर्ण केल्याचा अनुभव त्यांच्या या वेळच्या कामगिरीत मोलाचा ठरला.

शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राचा समन्वय

अध्यापनाचे पवित्र कार्य सांभाळून क्रीडा क्षेत्रात अशा प्रकारची उत्तुंग कामगिरी करणे ही बाब अत्यंत प्रेरणादायी आहे. शरीरापेक्षा मनाची शक्ती आणि आत्मबळ मोठे असते, हेच वसावे यांनी या धावण्याच्या शर्यतीतून सिद्ध केले आहे.महेंद्र वसावे यांच्या या गरुडझेपेमुळे त्यांचे मूळ गाव ’बिजरी’ (तालुका धडगाव) आणि कार्यक्षेत्र पंढरपूर येथील शिक्षक वृंदात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून, मित्र परिवाराकडून आणि ग्रामस्थांकडून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. ही कामगिरी आजच्या तरुण पिढीसाठी आरोग्याप्रती जागरूक राहण्याची आणि जिद्दीने ध्येय गाठण्याची नवी ऊर्जा देणारी ठरणार आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077